.. Shankara Arati ..

॥ शंकर आरती ॥

जय देव जय देव श्रीमंगेशा ।
पंचारति ओवाळू सदया सर्वेशा ॥ धृ॥

सदया सगुणा शंभो अजिनांबरधारी ।
गौरीरमणा आद्या मदनांतकारी ॥
त्रिपुरारी अधहारी शिवमस्तकधारी ।
विश्वंभर विरुदे हें नम संकट धारीं ॥ जय ॥ १॥

भयकृत भयनाशन ही नामें तुज देवा ।
विबुधादिक कमळासन वांछिती तव सेवा ॥
तुझे गुण वर्णाया वाटतसे हेवा ।
अभिनव कृपाकटाक्षें मतिउत्सव द्यावा ॥ जय ॥ २॥

शिव शिव जपता शिव तू करिसी निजदासा ।
संकट वारी मम तूं करी शत्रुविनाशा ॥
कुळवृद्धीते पाववी हीच असे आशा ।
अनंतसुत वांछितसे चरणांबुजलेशा ॥ जय ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 22, 1999